शासन निर्णय

महाराष्ट्र शासन

क्रमांक:मान्यता-२०१३/( ९५ /१३)/माशि-१
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक : २४ जुलै, २०१३

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ,
जातेगाव बु. ता.शिरुर जि.पुणे

विषय :-सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात सी.बी.एस.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणा-या कायम विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी शाळांना परवानगी देणेबाबत....
**बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ, जातेगाव बु. ता.शिरुर जि.पुणे द्वारा संचालित बालाजी इंग्लिश मिडीयम स्कूल, शिरुर (ग्रामीण), ता.पुणे जि.शिरुर**

संदर्भ :- १) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
क्र.नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक २०.०६.२०१२.
२) शासन पत्र क्रमांक हेतूप - २०१२ / (७५/१२) / माशि - १
दिनांक १० ऑक्टोबर, २०१२ चे हेतूपत्र.
३) शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे
दिनांक १५ मे, २०१३ चे पत्र.

संदर्भ क्रमांक १ अन्वये राज्यात सी.बी.एस.ई. / आय.सी.एस.ई./ आय.जी.सी.एस.ई./ सी.आय.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणा-या कायम विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरु करण्याकरीता राज्य शासनाकडे अर्ज केल्या नंतर सदर शाळांना हेतूपत्र (Letter Of Intent), परवानगी (Permission), मान्यता (Recognition) व ना हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) देण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्याप्रमाणे शाळा सुरु करण्यापूर्वी विहित केलेल्या कार्यपध्दतीची पुर्तता करणे बंधणकारक राहणार आहे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधिन क्रमांक ३ अन्वये प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या अर्जात नमूद केलेल्या **शिरुर (ग्रामीण), ता.पुणे जि.शिरुर** या ठिकाणी सी.बी.एस.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणा-या **इयत्ता १ ते १० वी** पर्यंतच्या कायम विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यासाठी माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधिन राहून शासन परवानगी देत आहे.

१) सदर शाळेला भविष्यात कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

शासन निर्णय

२) सदर ...न शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे, माध्यमिक शाळा संहिता, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

३) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारण असणे आवश्यक आहे.

४) संस्थेने सदर शाळेला शैक्षणिक दृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.

५) संस्थेने सदर शाळेसाठी स्वतंत्र क्रिडांगणाची सोय उपलब्ध करुन द्यावी.

६) संस्थेने सदर शाळेत मुख्याध्यापक पदी महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवा शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र.३(१) (ब) नुसार पात्र व्यक्तिची नियुक्ती करावी.

७) संस्थेने सदर शाळेत पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग नियुक्त करावा.

८) संस्थेने सदर शाळेत शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नियुक्त्या करताना बिंदु नामावलीनुसार करण्यात याव्यात.

९) संस्थेने सदर शाळेत सर्व साहित्यानिशी स्वतंत्र प्रयोगशाळा उपलब्ध करुन द्यावी.

१०) संस्थेने सदर शाळेत स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन द्यावी.

११) संस्थेने सदर शाळेत विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर, क्रिडा साहित्य, कार्यानुभव साहित्य व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.

१२) संस्थेने शाळेत अद्ययावत संगणक प्रयोगशाळा निर्माण करावी.

१३) मुला-मुलींसाठी स्वतत्र स्वच्छता गृहाची सोय असावी.

१४) संस्थेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

१५) शाळेस परवानगी व मान्यता देण्यासाठी विहित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्याचे शाळेने थांबिवले आहे असे निदर्शनास आल्यास शाळेची मान्यता महारष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम १२ नुसार काढून घेण्यात येईल.

१६) शाळेस शासनाकडून परवानगी दिल्यानंतर संस्था जास्तीत जास्त १८ महिन्याच्या आत परवानगी दिलेल्या ठिकाणी शाळा सुरु करेल.

१७) शासनाने संस्थेस ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिली आहे. त्याठिकाणी १८ महिन्याच्या आत शाळा सुरु न केल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द होईल.

१८) शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ मधील कलम १८ च्या अनुषंगाने नियम २०११ मधील नियम ११ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती पूर्ण केल्यावर **जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), पुणे** यांचेकडून शाळेला मान्यता घेणे आवश्यक राहील.

१९) **जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), पुणे** यांनी शाळेस मान्यता दिल्यावर संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नतेसाठी ना हरकत प्रमाणपत्रासाठी शासनाकडे अर्ज करेल.

सु.न. जोशी

(सु.न.जोशी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

शिक्षण संचालक (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे

शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे.

निवड नस्ती, माशि-१, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.